जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ७०६ दिनांक -१८/०९/२०२३

हडपसर पोलीस स्टेशन, पुणे शहर

# खुनाचे गुन्हयातील आरोपींना २ तासात केले जेरबंद

दिनांक १७/०९/२०२३ रोजी सार्वजनिक शौचालयाच्यावर, सर्वे नं.१५२ ए,मिरेकर वस्ती, हडपसर, पुणे या ठिकाणी मयत स्वप्नील विठ्ठल झोंबार्डे वय- १७ वर्षे यास आरोपी सनी रावसाहेब कांबळे, अमन शेख, आकाश कांबळे, व इतर ३ विधीसंघर्षित बालक यांनी संगनमत करुन पुर्वीच्या भांडणाचा राग मनात धरुन त्यांच्याकडील धारदार लोखंडी हत्यारांनी स्वप्नील याच्या डोक्यावर वार करुन त्यास जिवे ठार केले तसेच आरोपी यांनी त्यांच्या कडील लोखंडी धारदार हत्यारे हवेत फिरवुन परीसरात दहशत पसरवली. **त्याबाबत हडपसर पोलीस ठाणे येथे गु.र.नं १४०६/२०२३ भादंवि कलम ३०२,३४ सह भारतीय हत्यार कायदा कलम ४,२५ सह क्रिमिनल लॉ ॲमेडमेंट ॲक्ट ३ व ७ प्रमाणे प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.**

गुन्ह्यातील आरोपी सनी रावसाहेब कांबळे, अमन शेख, आकाश कांबळे, व ३ विधीसंघर्षित बालक यांचे बाबत तपास पथकातील अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक, विजयकुमार शिंदे, पोलीस उप निरीक्षक अविनाश शिंदे व अंमलदार यांनी माहीती घेतली असता, ते गुन्हा झालेनंतर फरार झाले होते. आरोपींबाबत उपयुक्त माहीती गोळा करून आरोपींचा पाठलाग गंजपेठ, स्वारगेट व परत हडपसर असा करत आरोपी १) आकाश हनुमंत कांबळे वय २३ वर्ष रा.मिरेकर वस्ती हडपसर पुणे व इतर ३ विधीसंघर्षित बालक यांना हडपसर भागातुन ताब्यात घेतले. आरोपींना हडपसर पोलीस ठाणेस घेवून येवून त्यांचेकडे तपास करता त्यांनी मयत स्वप्नील विठ्ठल झोंबार्डे याचेबरोबर झालेल्या भांडणाचा राग मनात धरून खुन केला असल्याचे सांगीतले. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद दोरकर, हडपसर पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ ५ श्री.विक्रांत देशमुख, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,हडपसर विभाग पुणे,श्रीमती अश्विनी राख यांचे मागदर्शना खाली, वरिष्ठ पोलीस निरीक्षक हडपसर पोलीस स्टेशन श्री.रविंद्र शेळके, पोनि.(गुन्हे) श्री.संदीप शिवले, श्री.विश्वास डगळे यांचे सुचनाप्रमाणे तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक, विजयकुमार शिंदे, पोलीस उप निरीक्षक अविनाश शिंदे, पोलीस अंमलदार,सुशील लोणकर,संदीप राठोड,समीर पांडुळे,सचिन जाधव, शाहीद शेख,प्रशांत दुधाळ,निखील पवार,अतुल पंधरकर,भगवान हंबर्डे,सचिन गोरखे,मनोज सुरवसे,अमोल दणके,अजित मदने,चंद्रकांत रेजीतवाड,कुंडलीक केसकर,रशिद शेख,प्रशांत टोणपे,अनिरूध्द सोनवणे यांचे पथकाने केली आहे.